सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा


# एस.टी.बस वळविण्यास चालकांना करावी लागतेय कसरत

- भर रस्त्यावरच उभी केली जातात वाहने
- अरुंद रस्ते, भाविकांची वाढती गर्दी
- अतिक्रमणामुळे तीर्थक्षेत्राची रया गेली





**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट । नंदकुमार जगदाळे**

''प्रवाशांच्या सेवेसाठी... गाव तेथे एसटी, रस्ता तेथे एसटी...'' अशी बिरुदावली असलेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यभरासह अन्य राज्यांपर्यंत प्रवासी सेवा बजाविण्यात येते. तर दुसरीकडे एस.टी. बसला वळण घेताना चालकांना कसरत करावी लागत असल्याचे चित्र श्रीक्षेत्र अक्कलकोट बसस्थानकसह परिसरात दिसून येत आहे.

अक्कलकोट तीर्थक्षेत्री भाविकांच्या संख्या प्रचंड वाढत आहे. येथील अरुंद रस्ते, वाढते अतिक्रमण, भर रस्त्यावरच उभी करण्यात येणारी वाहने यामुळे एस.टी.बसला वळण घेताना चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. बसस्थानकसह परिसरात पडलेला अतिक्रमणाच्या विळख्यामुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोटची 'रया'च जात असल्याचे सांगण्यात येते.

बसस्थानक, मेन रोड, बाजार पेठ, सावरकर चौक आदी भागात वाहतुकीची कोंडी होत आहे. तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथे रहदारी मोठया प्रमाणात वाढली. मात्र येथील रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात आले नाहीत. शिर्डी, पंढरपूर, तुळजापूर यांसारख्या तीर्थक्षेत्रांच्या धर्तीवर अक्कलकोट येथील रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी जोर धरत आहे

तीर्थक्षेत्री येणारे भाविक आणि वाहनांची संख्या, वर्षभरात साजरा होणारे उत्सव, शहरातून निघणाऱ्या पालख्यांच्या मिरवणुका आदींचा विचार करता पुढील २० वर्षांचा विचार करुन त्यादृष्टीने भूसंपादन करणे, रस्ते रुंदीकरण करणे यांसह अन्य कामे हाती घेणे गरजेचे बनलेले आहे, असेही सांगण्यात येते.

### असा आहे दुसरा मार्ग

मंदिराच्या उत्तर महाद्वार ते गुरू मंदिर, राम गल्ली, मधला मारुती, सुभाष गल्ली, दावल बँड ते कारंजा चौक मार्गे समाधी मठ असा दुसरा पालखी मार्ग असणार आहे. ९ मीटर रुंदीचा, ६00 मीटर लांबीचा असून २२ फुटाचा रस्ता अस्तित्वात आहे. दोन्ही बाजूने मिळून ८ फुटाचा भूसंपादन करावा लागणार आहे. १२५ ते १५0 प्रॉपर्टी बाधित होणार आहे.

### मास्टर प्लॅन आणि भूसंपादन

सन १९७२ मध्ये मास्टर प्लॅन नगरपालिकेने तयार केला असला तरी शासनाने सुचविलेल्या सूचनेवरुन वेळोवेळी त्यात दुरुस्ती करणेत आले आहे. सुधारित प्लॅन २0१२ मध्ये जाहीर करण्यात आले आहे. स्वामी समर्थ मंदिराच्या दक्षिण महाद्वार ते मुरलीधर मंदिर, फत्तेसिंह चौक, तूप चौक, कापड बाजार, मेन रोड, कारंजा चौक मार्गे समाधी मठ ते ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिर पर्यंत असे आहे. हा मार्ग १२ मीटर रुंदीचे, ८५0 मीटर लांबीचे असणार आहे. सध्या २५ ते २८ फुटाचे रस्ता अस्तित्वात असून आणखीन दोन्ही बाजूने मिळून १0 फुटाचा भूसंपादन करावा लागणार आहे. यासाठी किमान २00 प्रॉपटी बाधित होणार आहेत.

---

# ३0 जूनपूर्वीच शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ?

## दोन लाखांपर्यंतच्या कर्जासाठी निकष अंतिम टप्प्यात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१0 मार्च-**

राज्य सरकारने थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीच्या योजनेचा लाभ ३0 जूनपूर्वी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या योजनेचे निकष निश्चित करण्यासाठी अभ्यास सुरु असून सहकार विभागाचा अहवाल लवकरच राज्य सरकारकडे सादर होणार असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

राज्य सरकारच्या निर्णयानुसार ३0 सप्टेंबर २0२५ पर्यंत थकबाकीदार असलेल्या शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. ही कर्जमाफी प्रामुख्याने पीककर्जासाठी लागू असणार आहे. पीककर्जाची परतफेड साधारणपणे ३0 जूनपर्यंत करावी लागते, त्यामुळे त्याआधीच निकष निश्चित करुन पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे सध्या सुमारे २४ हजार शेतकरी थकबाकीदार असून त्यांच्याकडे सुमारे ३६२ कोटी रुपयांची थकबाकी आहे. या थकबाकीत पीककर्जासोबतच मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाचाही समावेश आहे. दुसरीकडे सुमारे ९0 हजार शेतकरी नियमित कर्जदार आहेत. दरम्यान, नियमित कर्जदार शेतकऱ्यांना ५0 हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा जास्त पीककर्ज असलेल्या शेतकऱ्यांना उर्वरित रक्कम आधी बँकेत भरावी लागणार आहे. सध्या तीन लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज बिनव्याजी मिळत असल्याने चार एकरांवरील अनेक शेतकऱ्यांनी तीन लाखांपर्यंत कर्ज घेतले आहे. अशा शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवण्यासाठी दोन लाखांवरील रक्कम म्हणजेच एक लाख रुपये बँकेत जमा करावे लागतील. त्यानंतरच त्यांच्या सातबारा उताऱ्यावरचा कर्जाचा बोजा कमी होईल. अन्यथा उर्वरित रकमेची वसुली बँकेकडून सुरु राहणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा कमी पीककर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना नेमके किती अनुदान मिळेल? याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याचे सांगण्यात येते. पूर्वीच्या योजनांप्रमाणे काही निकष कायम राहण्याची शक्यता असून नवीन निकषही निश्चित केले जाणार आहेत.

**थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती सादर**

मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफी साठीची पात्रतेची तारीख जाहीर केली आहे. लवकरच निकष निश्चित करुन पात्र नियमित व थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारकडे सादर केली जाईल. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे सहकार आयुक्त तावरे यांनी सांगितले.

---

# झेडपी आरोग्य विभागात बदल्यांच्या चौकशीत आढळली अनियमितता

- सीईओ कुलदीप जंगम यांनी उगारला कारवाईचा बडगा
- नागेश पाटील यांची कुर्डुवाडीत स्थानांतरण बदली



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१0 मार्च**

सोलापूर जिल्हा परिषदेत कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असताना मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी कडक भूमिका घेत आरोग्य विभागातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी नागेश (नागनाथ) पाटील यांची कुर्डुवाडी पंचायत समितीकडे स्थानांतरण बदली केली आहे.

सर्वसाधारण बदल्यांमध्ये आरोग्य विभागातील काही कर्मचाऱ्यांना बदल्यांमधून सूट देण्यात आल्याची तक्रार प्रशासनाकडे करण्यात आली होती. विशेषतः नागेश पाटील यांना बदलीतून वाचविण्यात आल्याची चर्चा होती. याची दखल घेत सीईओ जंगम यांनी चौकशीचे आदेश दिले होते. चौकशीत बदल्यांमध्ये काही अनियमितता आढळून आल्यानंतर पाटील यांना कुर्डुवाडी पंचायत समितीकडे स्थानांतरित करण्यात आले.

**गिरीश जाधव यांची पदोन्नती**

आरोग्य विभागातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी गिरीश जाधव यांना आरक्षण विरहित खुल्या प्रवर्गातून सहाय्यक प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देत त्यांची नियुक्ती आरोग्य विभागातच करण्यात आली आहे.

---

# सोलापूर विमानतळावर फ्लाईंग ट्रेनिंग संस्था होणार

## विद्यार्थ्यांचे पायलट होण्याचे स्वप्न साकारणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१0 मार्च-**

केंद्र सरकारच्या आत्मनिर्भर भारत संकल्पनेनुसार देशातील काही प्रमुख विमानतळांवर फ्लाईंग ट्रेनिंग ऑर्गनायझेशन स्थापन करण्यासाठी कंपन्यांकडून ई-टेंडरद्वारे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. यात सोलापूर विमानतळालाही संधी देण्यात आली आहे.

या उपक्रमासाठी ॲथॉरिट ऑफ इंडियाने देशातील सात विमानतळांची निवड केली. यात सोलापूरसह केशोद, कडप्पा, हुबळी, तुतिकोरिन, किशनगढ आणि धोलेरा विमानतळांचा समावेश आहे. याबाबतची अधिकृत घोषणा एअरपोर्टस अथॉरिटी ऑफ इंडियाने केली आहे. सोलापूरसह या सातही विमानतळांवर फ्लाईंग ट्रेनिंग संस्थांची स्थापना झाल्यास प्रशिक्षित पायलटांची संख्या वाढण्यास मोठी मदत होणार आहे. सोलापूर विमानतळाच्या विकासाला गती मिळण्यास आणि सोलापूरसह परिसरातील विद्यार्थ्यांचे पायलट होण्याचे स्वप्न साकारण्यात मदत होणार आहे.

---

# महिलेला मारहाण करत विनयभंग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १0 मार्च-**

कचरा टाकण्यावरुन झालेल्या किरकोळ वादातून तक्रार दिल्याच्या रागातून तक्रारदाराच्या पत्नीला कुऱ्हाडीच्या दांडक्याने दोघांनी मारहाण करत विनयभंग केला. याबाबत संबंधित महिलेने घराशेजारी राहणाऱ्या त्या दोघांविरुद्ध बार्शी तालुका पोलिसांत फिर्याद दिली आहे

फिर्यादी महिला व आरोपीच्या कुटुंबातील महिलेसोबत कचरा टाकण्यावरुन किरकोळ वाद झाला होता. फिर्यादी महिलेचा पती बाहेर गेल्यानंतर शेजारी राहणाऱ्या दोघांनी महिलेला कुऱ्हाडीच्या दांडक्याने मारहाण केली. त्यानंतर एकाने चुकीच्या ठिकाणी स्पर्श करत महिलेचा विनयभंग केला. या घटनेत महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र आरोपींनी काढून घेत तिच्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.

---

# पेट्रोल, गॅसचा काळाबाजार; प्रशासनाचे 'दक्षता पथक' तैनात

## पुरवठा अधिकाऱ्यांनी दिला कडक कारवाईचा इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १0 मार्च-**

जागतिक युध्दजन्य परिस्थितीमुळे इंधनाचा तुटवडा निर्माण होण्याची आणि दरवाढीची शक्यता लक्षात घेऊन, घरगुती एलपीजी गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी सोलापूर जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. प्रत्येक पेट्रोल पंप चालकांना याबाबत सूचना दिल्या आहेत. पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा काळाबाजार केल्यास कडक कारवाईचे आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिले आहेत. त्यामुळे काळाबाजार करणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

प्रत्येक तालुक्यात घरगुती गॅसच्या वितरणावर लक्ष ठेवण्यासाठी विशेष 'दक्षता पथक' किंवा 'फिरते पथक' तैनात करण्यात आले आहे. गॅस आणि पेट्रोल एजन्सीकडून होणाऱ्या वितरणात पारदर्शकता राहावी; यासाठी अचानक तपासणी करण्यात येणार आहे. घरगुती गॅसचा व्यावसायिक किंवा इतर अवैध कामांसाठी वापर करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. नागरिकांना घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत आणि वेळेवर व्हावा, यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

शासनाच्या प्राप्त पत्रानुसार, सध्याच्या जागतिक परिस्थितीचा फायदा घेऊन काही ठिकाणी इंधनाचा अवैध साठा किंवा 'ब्लॅक मार्केटिंग' होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही परिस्थिती हाताळण्यासाठी आणि सर्वसामान्यांचे हित जपण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने हे पाऊल उचलले आहे. या मोहिमेचा अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेशही संबंधित विभागांना देण्यात आले असून, यामध्ये कोणताही विलंब खपवून घेतला जाणार नाही, असे जिल्हा पुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे. याचबरोबर ज्या ठिकाणी मोठी इंधन टंचाई होण्याची शक्यता आहे; अशा पंपधारकांनी, गॅस एजन्सीवाल्यांनी तत्काळ पुरवठा विभागाकडे संपर्क साधावेत, असे आवाहनही सरडे यांनी केले आहे.

**सोलापूर जिल्ह्यात इंधन तुटवडा जाणवणार नाही**

जागतिक युध्द परिस्थिती विचारात घेता चोहीकडे इंधनाचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. मात्र सोलापूर जिल्ह्यात गॅस आणि पेट्रोल/डिझेलचा तुटवडा सध्यातरी जाणवत नाही. आपल्याकडे स्टॉकही बऱ्यापैकी असल्याने नागरिकांनी घाबरून जावू नये. पेट्रोल/डिझेलचे दर वाढण्याची, अवैध वापर (ब्लॅक मार्केटिंग) वाढण्याची शक्यता असल्याने इंधनाचे वितरण सुरळीत ठेवण्यासाठी उपाययोजना चालू आहेत. जिल्हा पुरवठा विभागाकडून दैनंदिन स्टॉकची माहिती आम्हाला मिळत आहे, असे प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगितले.

---

# उन्हाच्या झळांनी नागरिक निघताहेत होरपळून

## उष्मालाटेपासून बचाव होण्याच्या दृष्टीने काळजी घ्या




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १0 मार्च-**

राज्यात उन्हाळ्याची चाहूल लागताच सूर्याने आग ओकायला सुरुवात केली आहे. सोलापूर जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून या हंगामातील सर्वात जास्त तापमानाची नोंद झाली असून, पारा ४0.२ अंश सेल्सिअस वर पोहोचला आहे. यामुळे नागरिक उन्हाच्या झळांनी अक्षरशः होरपळून निघाले आहेत. वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताचा धोका देखील वाढला आहे. यामुळे वाढत्या तापमानाचा विचार करता सोलापूर जिल्हा आपत्ती विभागाने नागरिकांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.

उन्हापासून बचाव करण्यासाठी पुरेसे पाणी प्यावे, तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्या, घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करा. दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळावे, सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करा. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टीव्ही किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा, हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत, प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे.

उन्हात काम करीत असल्यास टोपी, छत्री किंवा ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकण्यात यावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास जठड, घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे, लिंबू-पाणी, ताक इत्यादीचा वापर नियमित करावा. अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे तसेच त्यांना पुरेसे पाणी पिण्यास देण्यात यावे. उन्हात अतिकष्टाची कामे करू नका, दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नका, दुपारी १२ ते ३ च्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळा, उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका, लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये, गडद घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे, बाहेर तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावी तसेच मोकळ्या हवेसाठी घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावीत, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सांगण्यात आले.




### तापमानात वाढ; ट्रॅफिक सिग्नल वेळेत बदल



सध्या उन्हाळा सुरु झाल्याने शहरात तापमानाचा पारा ३८ अंशावर जात आहे व सोलापूर शहरात तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. सर्व सामान्य नागरिक व वाहन चालकांना तापत्या उन्हाचा त्रास होवू नये याकरीता पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या आदेशाने ट्रॅफिक सिग्नल वेळेत बदल करण्यात आला आहेत. हे ट्रॅफिक सिग्नल सकाळी ९ ते ११ वा. सायंकाळी ४ ते रात्रौ ९वा. पर्यंत सुरु राहणार आहेत. यापुर्वी सदरची वेळ ही सकाळी ९ ते दुपारी २ वा. व सायंकाळी ४ ते रात्रौ ९ वा. अशी होती. वाहन चालकांना वाहन चालविताना शक्यतो पांढरे कपडे व टोपी परिधान करुन उन्हापासून वाचण्याचा प्रयत्न करुन स्वतःची काळजी घ्यावी. आपली वाहने रस्त्यास व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही अशा ठिकाणी पार्क करावीत असे आव्हानही पोलीस आयुक्त कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

---

# बाधित शेतकऱ्यांना घरपोच 'मावेजा' वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १0 मार्च-**

महाराष्ट्र शासन महसूल विभागांतर्गत महसूलची वारी, शेतकऱ्यांच्या दारी या उपक्रम अंतर्गत नाशिक-सोलापूर-अक्कलकोट ग्रीनफिल्ड कॉरीडोर प्रकल्पामुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटप करण्यासाठी गाव भेट दौरा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी सीमा होळकर यांनी दिली आहे.

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ११) कार्यालय, कृष्णा खोरे, सोलापूर यांच्या वतीने ज्या शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई नोटीस मिळूनही अद्याप रक्कम स्वीकारलेली नाही, अशा खातेदारांना थेट गावात जाऊन नुकसान भरपाई वाटप करण्याची योजना आखण्यात आली आहे. या दौऱ्यांतर्गत दक्षिण सोलापूर, बार्शी आणि अक्कलकोट तालुक्यातील विविध गावांमध्ये महसूल जनसंवाद कार्यक्रम होणार असून, मंडळ अधिकारी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालये तसेच सांस्कृतिक सभागृह अशा ठिकाणी शेतकऱ्यांना थेट नुकसान भरपाई देण्यात येणार आहे.

**दक्षिण सोलापूर**
मुस्ती/तिर्थ (९ मार्च), तांदुळवाडी/धोत्री (१0 मार्च)

**बार्शी**
वैराग परिसरातील गाव (११ मार्च), अलीपूर परिसरातील गाव (१३ मार्च), पानगाव परिसरातील गाव (१४ मार्च)

**अक्कलकोट**
चपळगाव परिसरातील गाव (१६ मार्च), मैंदर्गी नगरपरिषद (१७ मार्च), नागणहळ्ळी व मिरजगी (१८ मार्च) असे वाटप होणार आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३७९

**करवितां व्रत अर्धे पुण्य लाभे।**
**मोडविता दोघे नरका जाती।।**

चांगले वागणे जेवढे अवघड आहे, त्यापेक्षाही इतरांना चांगल्या मार्गावर आणणे किंवा इतरात चांगुलपणा निर्माण करणे अवघड आहे. बहुतांश लोक तर स्वत:ही चांगले वागत नाहीत आणि इतरांनाही चांगले वागू देत नाहीत. पण कांही लोक समाजात असे पहायला मिळतात की जे स्वत:ही खूप चांगले वागतात आणि इतरांनी चांगले वागावे म्हणून सदैव प्रयत्नशील राहतात. एकादशी व्रत हा वारकरी सांप्रदायाचा एक महत्वाचा भाग आहे. एकादशी व्रतामुळे माणसाला भूकेचे महत्व कळते. त्याच्या उपवासामुळे जे अन्न वाचते ते गोरगरीबांच्या, भुकेल्यांच्या कमी येऊ शकते. भूक काय असते याची जाणीव झाल्याने उपाशी किंवा अर्धपोटी रहाणाऱ्यांबद्दल मनात दया निर्माण होते. एकादशीचा उपवास धरण्यामुळे खाण्यापिण्यावर लक्ष न जाता ते ईश्वरचरणी किंवा आत्मस्वरुपी स्थिर होते. असे हे विविध अंगी महत्वपूर्ण असणारे व्रत स्वत:ही करावे आणि इतरांकडूनही करवून घ्यावे. इतरांना या व्रताच्या मार्गावर आणणे म्हणजे त्याच्या शुध्दतेबरोबर किंवा त्याच्या पवित्रतेबरोबर आपणही शुध्द, पवित्र होणे होय. पण एखादा एकादशी व्रत करीत असेल तर त्यात मोडा घालणे किंवा त्याला त्या व्रतापासून परावृत्त करणे म्हणजे वाईटपणा घेणे होय, किंवा पापाला, दुष्कृत्याला सामोरे जाणे होय. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, करविता व्रत अर्धे पुण्य लाभे। मोडविता दोघे नरका जाती ।।



मूळात जे चांगले आहे, ते निर्माण करणे, त्याची जोपासणूक करणे आणि इतरात ते रुजविणे हे निश्चितच चांगले असते. त्याचबरोबर मूळात जे वाईट आहे त्याचे आचरण करणे किंवा इतरांना त्याचे आचरण करण्यास भाग पाडणे वाईटच असते. दुसऱ्याला वाईट करण्यासाठी प्रथम आपण वाईट व्हावे लागते. अर्थात आपल्याला प्रथम आपल्यात वाईटाला जागा द्यावी लागते. मनुष्य हा देह इतर प्राणीमात्राच्या तुलनेत भाग्यशाली देह आहे, असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. कारण मानवाला आचार-विचार, भावनांची देवाण-घेवाण सहजतेने करता येते.निसर्गाने मानवाला ही चांगली संधी निर्माण करून दिली आहे. या संधीचा प्रत्येकानी सदुपयोग केला पाहिजे. अर्थात, चांगुलपणाची जोपासणूक आणि वाईटपणाचे निर्मूलन करायला हवे. संत महात्म्यांनी जी सत्कर्म वाढण्याची व दुष्कर्म नष्ट होण्याची अपेक्षा केली आहे ती अपेक्षा प्रत्येक व्यक्ती पूर्ण करू शकतो. संतांच्या या अपेक्षा पूर्णत्वास नेण्यासाठी आपली फक्त मानसिक तयारी असावी लागते. खरे म्हणजे संतांची ही अपेक्षापूर्ती म्हणजे आपणच आपले जीवन सुखी-समाधानी करून घेणे होय. मी तर असे म्हणेन की, संतांची ही अपेक्षा पूर्ण करता नाही आली तरी चालेल, पण त्यांच्या अपेक्षांची खिल्ली तरी उडविली जाऊ नये. अर्थात, इतरांना चांगले वागायला लावू शकलो नाही तरी चालेल; पण कोणत्याही परिस्थितीत आपण इतरांना वाईट वागायला लावू नये. तसेच कोणालाही चांगल्या मार्गावरून वाईट मार्गावर नेऊ नये.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार,**
**दि. ११ मार्च २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - फाल्गुन कृ. अष्टमी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- ज्येष्ठा (२१.५९)**
**योग - वज्र (०९.११)**
**करण - बालव (१५.०७.)**
**राहू काल : बुधवार**
**स. ७.३० ते ९.००**

**दिनविशेष : कालाष्टमी.**
**२००१: बॅडमिंटनपटू पी. गोपीचंदने तब्बल एकवीस वर्षांनी ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतपद भारतास मिळवून दिले.**
**२००१: कसोटी क्रिकेटमधे हॅटट्रिक घेणारे हरभजनसिंग हे पहिले भारतीय गोलंदाज बनले. त्यांनी ऑस्ट्रेलियाविरुद्ध ही कामगिरी केली.**



## महिलांनी मुलांच्या संगोपनासोबत आरोग्यही जपावे : ॲड. गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

बाळे येथील राजेश्री नगरमधील एन. के. किड्स स्कूलमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त महिला पालकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी बोलताना ॲड. दिपाली गायकवाड यांनी महिलांनी मुलांच्या संगोपनाबरोबरच स्वतःच्या मानसिक आरोग्याकडेही लक्ष देणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. महिला दिनानिमित्त शाळेच्या वतीने महिला पालकांसाठी उखाणे स्पर्धा, लिंबू-चमचा स्पर्धा, संगीत खुर्ची आदी विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना महिला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका श्वेता कस्तुरे, हेड शिक्षिका दिपाली कुलकर्णी, अश्विनी शिंगण, पूनम कळसाईत, सेविका संगीता हेगडकर, सुरेखा शिंदे तसेच महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे महिला पालकांना एकत्र येऊन आनंद साजरा करण्याची तसेच मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याची संधी मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# महिलांचे सक्षमीकरण समाजाच्या सर्वांगीण विकासाचा प्रमुख आधार

**महापौर कोंड्याल** | महिला महोत्सवचे उद्घाटन; ४० बचतगटांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

महिलांचे सक्षमीकरण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे प्रमुख आधार आहे. शिक्षण, उद्योग, कला आणि सामाजिक क्षेत्रात महिलांनी उल्लेखनीय कार्य करत समाजाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महिला महोत्सवांमुळे महिला बचत गटांना त्यांच्या कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी व्यापक व्यासपीठ मिळते, असे प्रतिपादन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले.



महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभाग तसेच -, युसीडी यांच्या वतीने ९ ते ११ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित ''महिला महोत्सव व सांस्कृतिक कार्यक्रम २०२६'' या महोत्सवाचे उद्घाटन आज इंद्रभुवन परिसर येथे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमहापौर देवकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, गटनेते वाहिदा बानो शेख, गटनेते अमोल शिंदे, गटनेते चेतन नरोटे, गटनेते वैभव हत्तुरे, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. महोत्सव ९ ते ११ मार्च २०२६ या कालावधीत इंद्रभुवन परिसर येथे सुरू राहणार असून नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**महोत्सवात ४० महिला बचत गटांचे विविध उत्पादनांचे स्टॉल**

या महोत्सवात शहरातील ४० महिला बचत गटांनी विविध उत्पादनांचे स्टॉल उभारले असून घरगुती खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, कपडे, दैनंदिन उपयोगाच्या वस्तू आदी उत्पादनांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

उद्घाटनानंतर महापौरांसह उपस्थित मान्यवरांनी सर्व स्टॉलला भेट देत महिला बचत गटांच्या उपक्रमांची पाहणी केली व त्यांच्या कामाचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहन दिले. पहिल्याच दिवशी विविध स्टॉलवर खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.



## योग्य निर्णयक्षमतेमुळे महिलांना जीवनात यश

**डॉ. पद्मजा गांधी यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

विद्यार्थिनींनी जीवनात कायम स्वरूपी आनंदाचा शोध घ्यावा, क्षणिक किंवा भावनिक गोष्टींमध्ये वाहून जाऊ नये. आत्मविश्वास, सकारात्मक विचार आणि योग्य निर्णयक्षमतेमुळे महिलांना जीवनात यश मिळू शकते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध होमिओपॅथी व मानसशास्त्रज्ञ डॉ. पद्मजा गांधी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. गांधी या बोलत होत्या. संस्थेच्या सचिवा जयश्री माने यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. महाविद्यालयातील एन.एस.एस. विभाग व महिला सेल यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सूत्रसंचालन प्रा. ए. डी. शहाणे यांनी केले तर यशस्वी आयोजनासाठी प्रा. उषा दोडमिसे, प्रा. स्नेहल परदेशी तसेच इतर प्राध्यापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून महिला सक्षमीकरण, आत्मविश्वास आणि समाजातील महिलांची भूमिका याविषयी आपले विचार मांडले. कार्यक्रमा मुळे उपस्थितांना प्रेरणा मिळाली.

## बोधिसत्व डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळ
# विश्वस्त अध्यक्षपदी आनंद चंदनशिवे

**सचिवपदी रॉकी बंगाळे यांची निवड**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

येथील बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या विश्वस्त अध्यक्षपदी माजी गटनेते आनंद चंदनशिवे तर सचिव पदी रॉकी बंगाळे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती विश्वस्त समितीचे मावळते अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मध्यवर्ती महामंडळाच्या विश्वस्तांची बैठक दि. ५ मार्च २०२६ रोजी सम्राट चौक येथील चित्रा हॉटेलमध्ये ज्येष्ठ नेते पी. आर. बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बाळासाहेब वाघमारे यांच्या विश्वस्त अध्यक्ष पदाची तीन वर्षाची मुदत संपली तसेच सचिव पदावरील केरू जाधव यांचे निधन झाल्याने या दोन्ही पदावर नवी नियुक्ती करण्यात आली आहे. विश्वस्त अध्यक्षपदी आनंद चंदनशिवे तर सरचिटणीस पदी रॉकी बंगाळे यांची एकमताने निवड केली आहे. उर्वरित विश्वस्त कमिटी आणि त्यांची पूर्वीची पदे जैसे थे ठेवण्यात आली आहेत.

सोलापूरला साजेशी अशी भीम जयंती यंदाही साजरी करण्यात येणार आहे. महामंडळाच्या येणाऱ्या बैठकीमध्ये भीम जयंती उत्सवा संदर्भात अंतिम नियोजन ठरविण्यात येणार आहे. दिमाखात मिरवणूक काढण्यात येणार आहे, असे नुतन विश्वस्त अध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस सचिव रॉकी बंगाळे, उत्सव समिती अध्यक्ष विकी शेंडगे, पी. आर. बनसोडे, बाबा बाबरे, मिलिंद प्रक्षाळे , सागर उबाळे, विनोद वाघमारे, अजित बनसोडे, शांतीकुमार नागटिळक, सिद्धेश्वर पांडगळे, आशुतोष नाटकर, सुहास सावंत, दत्ता शिंदे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

## सोलापुरात १४ मार्चपासून 'प्रहर' चित्र व शिल्प प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

येथील नवोदित आणि कल्पक कलाकारांच्या कलाकृतींचे दर्शन घडविणारे प्रहर समूह चित्र व शिल्प प्रदर्शनाचे आयोजन १४ ते २२ मार्च दरम्यान सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत झपूर्जा आर्ट गॅलरी, पु. ना. गाडगीळ अँड सन्स, डफरीन चौक येथे केल्याची माहिती निखिल काटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.



याचा उद्घाटन सोहळा शनिवार १४ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता होईल. जगविख्यात शिल्पकार भगवान रामपुरे, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार डॉ.सचिन खरात, श्री सिद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते तसेच उद्योजक किशोर चंडक, दत्ता सुरवसे, राजेश काटकर, उद्योजक ऋत्विज चव्हाण, सिंहगड इन्स्टिट्यूट, सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. संजय नवले, उद्योजक माधव मैदर्गीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन होईल. या प्रदर्शनात शिल्पकार निखिल काटकर, चित्रकार वैभव वाघमारे, प्रदीप सुतार, नवराज सकिनाल, आकाश गुमटे, आकाश नंदुर यांच्या कलाकृती आहेत. १५ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजता डॉ. सचिन खरात (चित्रकला प्रात्यक्षिक), १७ मार्च रोजी पाच वाजता अनिकेत कांबळे (निसर्ग चित्र) तसेच २१ मार्च रोजी पाच वाजता आनंद साई (वास्तववादी रेखाचित्र) हे आपली कला सादर करतील. २२ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता प्रदर्शनाचा समारोप होईल. यावेळी चित्रकार डॉ. सचिन खरात यांचे मार्गदर्शन तसेच अमृत साळुंखे यांच्या उपस्थितीत 'कलेचा इतिहास' या विषयावर विशेष चर्चा होईल. हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. या पत्रकार परिषदेस वैभव वाघमारे, प्रदीप सुतार, नवराज सकिनाल, आकाश गुमटे, आकाश नंदुर आदी उपस्थित होते.

## ब्रह्मदेवदादा माने तंत्रनिकेतनमध्ये उद्योजकता विकास शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

ब्रह्मदेवदादा माने तंत्रनिकेतन महाविद्यालयामध्ये एम. एस. बी. टी. ई. अभ्यासक्रमांतर्गत तीन दिवसीय उद्योजकता विकास कार्यक्रम संपन्न झाला. याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. श्रीकांत जोशी, संकुल संचालक प्रा. राहुल माने, समन्वयक प्रा. शशिकांत फुलारी, प्रा. दीपकचंद्र घुले, प्रा. राजू पवार, प्रा. लक्ष्मीकांत चौगुले, प्रा. पुनम खंडागळे, प्रा. श्रेणिक कंदले यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाले.



प्रथम सत्रामध्ये कानडे ग्रुप ऑफ ट्रेनिंगचे सीईओ प्रमोद कानडे यांनी स्टार्टअप साठी एक चांगली व्यवसाय कल्पना असणे आवश्यक आहे ज्यामधून लोकांच्या गरजा पूर्ण होऊ शकतात. बाजारपेठेचा अभ्यास करून, कल्पनेची व्यवहार्यता तपासून एक तपशीलवार व्यवसाय योजना करण्यासाठी एक चांगली टीम तयार करावी लागते. टीममध्ये विविध कौशल्ये असलेले लोक असावेत. व्यवसायात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यक्षमता वाढवावी, असे त्यांनी मार्गदर्शन केले.

द्वितीय सत्रामध्ये श्रीविद्या इन्फोटेक्नॉलॉजीचे एमडी राजेश खत्री यांनी विद्यार्थ्यांशी विक्री आणि विपणन या विषयावर संवाद साधला. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीप माने, उपाध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य डॉ. पृथ्वीराज माने, संस्थेच्या सचिवा जयश्रीताई माने, संकुलाचे संचालक प्रा. राहुल माने व प्राचार्य डॉ. श्रीकांत जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उद्योजकता विकास विभागाचे प्रमुख प्रा. ऋषिकेश गायकवाड, प्रा. राहुल ढगारे, प्रा. वैष्णवी कुलकर्णी, प्रा. अंबू खलसोडे, प्रा. सोनल पोतदार, प्रा. स्वाती घाडगे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन तसबिहा बंदुकवाले व रुपाली सुतार यांनी केले.



## 'हिराचंद नेमचंद'मध्ये महिला दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स येथे व्यवस्थापन विभाग आणि 'हिरकणी महिला सक्षमीकरण केंद्र' यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ''ती आत्मविश्वासाची ज्योत'' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमातून महिला सक्षमीकरण, आरोग्य जागरूकता आणि उद्योजकतेचा प्रभावी संदेश देण्यात आला. प्राचार्य डॉ. सत्यजित शहा अध्यक्षस्थानी होते.


नॅचरोपथी सल्लागार डॉ. सोनाली घोंगडे यांनी महिलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करत संतुलित आहार, नियमित व्यायाम, नैसर्गिक उपचारपद्धती आणि सकारात्मक जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले. 'फार्मसीड्स ॲग्रो', संस्थापक सविता जुजगार यांनी उद्योजकतेतील स्वतःचा प्रवास सांगत महिलांनी जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या बळावर कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करू शकते, असा विश्वास व्यक्त केला. ग्रामीण व शहरी भागातील महिलांनी नव्या संधींचा लाभ घेऊन उद्योजकतेकडे वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले. सौ. जुजगार यांच्या 'फार्मसीड्स ॲग्रो' या व्यवसायावरील माहितीपर डॉक्युमेंटरी चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना ''उदयोन्मुख महिला उद्योजक पुरस्कार'' देऊन गौरविण्यात आले.

प्रास्ताविक डॉ. प्रीतम कोठारी यांनी मांडली. पाहुण्यांचा परिचय प्रा. गायत्री लिगाडे आणि प्रा. गायत्री बेनगिरी यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तन्वी मंथळ व संजना मशाळकर यांनी केले. डॉ. रजनी क्षीरसागर यांनी आभार मानले.

## प्रा. डॉ. अभय जाधव व डॉ. संतोष चतुर्भुज यांच्या संयुक्त संशोधनात सोलापुरचा भरीव ठसा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मार्च-**

येथील वालचंद महाविद्यालय समाजकार्य विभागाचे प्राध्यापक प्रा. डॉ. अभय जाधव आणि महर्षी परशुराम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, वेळणेश्वर (जि.रत्नागिरी) येथील डॉ. संतोष चतुर्भुज यांचा संयुक्त संशोधन पेपर भारत सरकारच्या संरक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक-सांख्यिकी संशोधन क्षेत्रात जागतिक स्तरावर मान्यता जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे.



Defence Scientific Information and Documentation Center (DESIDOC) हे जर्नल आहे. विशेष म्हणजे या जर्नलचा समावेश जागतिक श्रेणी-२ मध्ये होतो. या पार्श्वभूमीवर सोलापूर व महाराष्ट्राच्या शैक्षणिक विश्वासाठी ही बाब अत्यंत अभिमानास्पद ठरली आहे. ''शाश्वत विकास संशोधनाचे सायंटोमेट्रिक्स व नेटवर्क विश्लेषणाद्वारे मॅपिंग : एक अभ्यास'' असा या संशोधन पेपरचा विषय आहे. या अभ्यासात एकूण २७ हजार ४९४ संशोधन प्रकाशने तपासण्यात आली. हे संशोधन धोरणकर्ते, संशोधक, समाजकार्य अभ्यासक आणि शैक्षणिक संस्थांसाठी मार्गदर्शक ठरणार असून, शाश्वत विकासासाठी भविष्यातील धोरणात्मक संशोधन उपक्रम आखण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल,

हवामान कृती (SDG-13) या उद्दिष्टावर सर्वाधिक संशोधन झाल्याचे या अभ्यासातून दिसून येते, जे जागतिक पातळीवरील हवामान बदलाचे गांभीर्य अधोरेखित करते. तसेच चीन, पोलंड आणि स्पेनमध्ये देशांतर्गत संशोधन सहकार्य अधिक मजबूत असल्याचे, तर केनिया आणि स्वित्झर्लंडमध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्याचे प्रमाण जास्त असल्याचेही अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. भारतात दिल्ली, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांचे संशोधनातील योगदान लक्षणीय असल्याचे या संशोधनातून पुढे आले आहे.

या उल्लेखनीय संशोधन यशाबद्दल वालचंद शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. रणजीत गांधी व इतर पदाधिकारी, प्राचार्य डॉ. संतोष कोटी तसेच सर्व सहकारी प्राध्यापक वृंद आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या संशोधन कार्यास शुभेच्छा दिल्या.




## संभाजी ब्रिगेडची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**

संभाजी ब्रिगेड जिल्हा कार्यकारिणीची नूतन पदाधिकारी निवडीची बैठक श्याम कदम, ॲड. बाबासाहेब सपाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले यांच्या हस्ते नूतन पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष भोसले यांनी शहरांमध्ये भविष्यात महाराष्ट्र धर्म हा कार्यक्रम घेण्यात येणार असून, सप्टेंबर मध्ये होणाऱ्या ब्रिगेडच्या जिल्ह्याच्या अधिवेशनाबाबत कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे असे आवाहन केले. नूतन कार्यकारिणी अशी : विक्रम वानकर (उत्तर सोलापूर तालुका अध्यक्षपदी धनाजी जाधव (मोहोळ) जैनुद्दीन नदाफ (दक्षिण सोलापूर) शत्रुघ्न माने (जिल्हा संपर्कप्रमुख), शेखर भोसले (जिल्हा कार्याध्यक्ष), संतोष सुरवसे (उद्योग आघाडी शहराध्यक्ष), महेश मसलकर, फिरोज सय्यद (जिल्हा उपाध्यक्ष).

**संजीवनी सलबते जिल्हा उपाध्यक्ष**

महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनल दास यांनी महिला आघाडीच्या पदाधिकारी नियुक्ती केले. ते याप्रमाणे : संजीवनी सलबत्ते (जिल्हा उपाध्यक्ष), सुनंदा सूर्यवंशी (जिल्हा कार्याध्यक्ष), सुनिता कारंडे (जिल्हा सचिव), मनीषा कोळी (जिल्हा संघटक), माधुरी चव्हाण, मंजुषा दास (शहर कार्याध्यक्ष), अंजली मोहित (शहर सचिव), लक्ष्मी चव्हाण (मोहोळ तालुका अध्यक्ष)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जिल्ह्यात महिला दिन साजरा



## जवाहरलाल शेतकी विद्यालय, पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जवाहरलाल शेतकी विद्यालयाच्या वतीने जागतिक आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून पिलीव विभागातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या व सामाजिक सेवा केलेल्या विविध महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रारंभी ज्ञानज्योती तथा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाच्या संचालिका स्नेहल जहागिरदार व प्रवचनकार पूनम अक्षय भैस यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून महिला दिनाच्या कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. मुख्याध्यापक विजयकुमार देशमुख यांनी प्रास्ताविक केले. यावेळी अनिता जेऊरकर, स्नेहल जहागिरदार, डॉ. सायना गुळभिले, अप्रिन पठाण, जामदार, मुमताज पठाण उपस्थित होते.




## लोकविकास स्कूल, वेळापूर

लोकविकास इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये २ मार्च ते ८ मार्च महिला सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी स्त्रीरोग व त्वचारोग तज्ञ डॉ. उर्मिला अभिजीत पाटील तसेच प्रमुख पाहुणे म्हणून महिला पोलिस कॉन्स्टेबल सोनाली सोनवलकर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शिवन्या बनकर, अहिल्या लवटे, आर्या फरतडे, स्वरा माने या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच सहशिक्षिका ज्योती गाडेकर यांनी महिलांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल माहिती दिली. महिला दिनानिमित्त मुलीसाठी आरोग्य मार्गदशन, संगीत खुर्ची, चित्रकला, मेहंदी, क्रीडा स्पर्धा याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक अमोल पांढरे, अजित बनकर उपस्थित होते. सूत्रसंचालन राणी शिंदे तर आभार पूजा कुदळे यांनी मानले.



## शिवाजी महाविद्यालय, बार्शी

श्री शिवाजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कविता सादरीकरण व लेखवाचन या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावर्षीच्या महिला दिनाची गिव्ह टू गेन देणे म्हणजेच मिळवणे ही संकल्पना विद्यार्थ्यांसमोर मांडत महिला सशक्तीकरण, शिक्षण आणि समानतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, कला समन्वयक प्रा. डॉ. बी. डी. पारसे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. समाधान पवार यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. श्रीराम वैद्य यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात महिलांचे समाजातील योगदान, शिक्षणातील प्रगती आणि महिलांना समान संधी मिळणे किती आवश्यक आहे याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ.राहुल पालके यांनी केले. प्रा. वैभव कुलकर्णी यांनी संरक्षण क्षेत्रातील सोफिया कुरेशी व व्योमिका सिंग या महिलांचे योगदान प्रस्तुत केले. मीरा गायकवाड, वैशाली देशमुख, अश्विनी जाधव, पायल लोखंडे, तेजस कोळेकर, श्रीधर झांबरे , त्रिशा जाधव या विद्यार्थ्यांनीही कवितांचे सादरीकरण करुन स्त्री शक्तीचा जागर केला. महिला दिनाचे औचित्य साधून श्रुती तांबे, सृष्टी गवळी, सायली पौळ, रुपाली टिंगरे, नंदिनी भाकरे, प्रथमेश करळे यांनी लेखवाचनातून महिलांच्या विश्वाला साद घातली.



## विजय क्लॉथ सेंटर, वळसंग

जागतिक महिला दिनानिमित्त वळसंग येथे भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन विजय क्लॉथ सेंटर व समर्थ क्लॉथ सेंटर यांच्यावतीने करण्यात आले होते यामध्ये प्रथम क्रमांक अदिती नारायणकर,द्वितीय क्रमांक संगीता केशेट्टी ,तृतीय क्रमांक रेशमा धनशेट्टी, उत्तेजनार्थ मनीषा मणुरे ,उत्तेजनार्थ प्राची कुर्ले यांनी मिळवला.विजय क्लॉथ सेंटर यांच्याकडून विजेत्यांचा बनारसी शालू, सिल्क साडी, सॉफ्ट सिल्क साडी, लेस साडी देऊन सन्मान करण्यात आला.या स्पर्धेसाठी प्रतिभा दुधगी, अजय माणकोजी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. विजय क्लॉथ सेंटर मधील महिला कर्मचाऱ्यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.



## विष्णुपंत कुलकर्णी स्कूल, माळशिरस

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूल, येथे खेळ पैठणीचा, सन्मान गृहलक्ष्मीचा हा कार्यक्रम जल्लोषात संपन्न झाला. यावेळी महिलांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन मानसी कुलकर्णी तसेच इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या इनामदार यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेत प्रतिभा वाघमारे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावत शाही पैठणीच्या मानकरी होण्याचा बहुमान मिळवला, तर सुषमा बांगर यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. प्रथम क्रमांकाच्या विजेत्या स्पर्धकाला प्रमोद क्लॉथ सेंटर यांच्या वतीने शाही पैठणी देऊन गौरविण्यात आले तर द्वितीय क्रमांकाच्या स्पर्धकाला तांबोळी व्हरायटीज यांच्याकडून प्रवासी बॅग देऊन सन्मानित करण्यात आले.

# अक्कलकोटमध्ये पायाभूत सुविधांसाठी २५ कोटी मंजूर

● विकासकामांचा धडाका; आ.सचिन कल्याणशेट्टींच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० मार्च-**

अक्कलकोट विधानसभा मतदार संघातील विविध विकासकामांना चालना देण्यासाठी राज्य शासनाने तब्बल २५ कोटींचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून तालुक्यातील रस्ते, पूल तसेच पायाभूत सुविधांच्या कामांना गती मिळणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



या निधीसाठी अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. राज्याच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्र या संकल्पनेच्या अनुषंगाने विविध विकासकामाना प्राधान्य देत निधीची तरतूद केली आहे. या २५ कोटी रुपयांचा निधीतून महत्त्वाच्या रस्त्यांचे मजबुतीकरण, पूल बांधकाम तसेच काही ठिकाणी रस्ते दुरुस्ती व सुधारणा केली जाणार आहे. ग्रामीण भागातील वाहतूक सुलभ होणार असून शेतकरी, व्यापारी व नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत हा निधी मंजूर करून घेतल्याने विकासकामंना गती मिळणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

निधीमुळे अक्कलकोट विकसित महाराष्ट्र या संकल्पनेला बळ मिळणार असल्याचे मत माजी उपसरपंच तथा जिल्हा वीट उत्पादक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष विजयकुमार शबाशे व्यक्त केले आहे. अक्कलकोट तालुक्यातील अरळी गावाजवळील पुलाचे बांधकाम साठी ३.५० कोटी, बोरेगाव ते हन्नुर रस्ता सुधारणा ७.५० कोटी,सातन दुधनी ते उडगी रस्ता सुधारणा ४.५० कोटी, चुंगी ते कुरनूर रस्ता २.०० कोटी, शावळपूल व शावळगाव रस्ता दुरुस्ती ०.५० कोटी, वळसंग ते तीर्थ दक्षिण सोलापूर रस्ता सुधारणा ५.५० कोटी, धोत्री ते गोकुळ शुगर कारखाना साखर कारखाना रस्ता - ५.५० कोटी असे एकूण २५ कोटी रु.निधी मंजूर आहेत.

# रिक्त पदांवर सेवानिवृत्त शिक्षकांची तात्काळ नियुक्ती करावी

● शिक्षण मंत्री भुसे यांच्याकडे आ. डॉ. देशमुख यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१० मार्च-**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये रिक्त असलेल्या शिक्षकांच्या पदांवर सेवानिवृत्त शिक्षकांची तात्काळ नियुक्ती करण्याची मागणी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांची भेट घेत केली. या भेटीदरम्यान ग्रामीण भागातील शालेय शिक्षणाच्या वाढत्या संकटावर चर्चा करण्यात आली.



यावर मंत्री भुसे यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांच्या रिक्त पदांची संख्या वाढतच आहे. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या अहवालानुसार, सध्या सुमारे १५ हजार हून अधिक प्राथमिक शिक्षकांच्या पदांवर नियुक्त्या प्रलंबित आहेत. यामुळे ग्रामीण भागातील शाळांमध्ये एकच शिक्षक अनेक वर्ग हाताळत असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत नवीन भरती प्रक्रिया रखडली असताना, सेवानिवृत्त शिक्षकांना पुन्हा सेवा देण्याचा पर्याय हा तात्पुरता उपाय म्हणून पुढे आला आहे.

ग्रामीण भागातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, ही आमची जबाबदारी आहे. सेवानिवृत्त शिक्षकांकडे अनुभवाची खाण आहे. त्यांना पुन्हा सेवा देऊन शाळा मजबूत करणे गरजेचे आहे, अशी प्रतिक्रिया आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

# लग्नसमारंभात कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. १० मार्च-**

महिला दिनानिमित्त लग्नसमारंभात कर्तुत्ववान महीलांचा सन्मान,डीजेचा कर्णकर्कश आवाजाला फाटा देत वरातीपुढे टाळ मृदंगाच्या तालावर ठेका धरणारे बाल वारकरी अन् हा सोहळा कुतुहलाने पाहाणारे वऱ्हाडी मंडळी उपस्थित सर्व महिलांना ज्ञानेश्वरी ग्रंथाची भेट देऊन साजरा झालेल्या या खातगाव (ता.करमाळा) येथील रणसिंग परिवाराचा आगळा वेगळा विवाह सोहळ्याची करमाळा तालुक्यात सर्वत्र चर्चा सुरू असून हा सोहळा इतरांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरत आहे .



करमाळा तालुक्यातील खातगाव येथील गणसिंग परिवार हा वारकरी संप्रदायिक विचाराने प्रभावित असणारा परिवार असून ८ मार्च रोजी या परिवारातील राजेंद्र रणसिंग यांच्या मुलीचा विवाह सोहळा पार पडला या विवाह सोहळ्यात त्यांनी वरातीसाठी कर्णक्य आवाजातील डीजे बँजो याला फाटा देऊन टाळ मृदंगाच्या तालावर मुखात हरीनाम घेणारे वारकरी सहभागी झाले होते या परिवाराने महिलांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने आवर्जून महिला दिनाची तारीख निवडली होती या दिवशी करमाळा तालुक्यातील व परिसरातील दहा कर्तत्ववान महिलांना सन्मानचिन्ह व पुरस्कार देऊन सन्मानित केले या सोहळ्यासाठी ज्येष्ठ पत्रकार राजा मानेड बाबुराव हिरडे उपस्थित होते. यावेळी उपस्थित असणाऱ्या सर्व महिलांना रणसिंग परिवाराच्या वतीने ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देण्यात आला.

# पिलीव जि.प. शाळेतील गुणवंतांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १० मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जिल्ह्य परिषद प्राथमिक केंद्र शाळा पिलीव या शाळेतील विविध स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. यामध्ये महीला दिनानिमित्त पहीली व दुसरीतील विद्यार्थ्यांसाठी आयोजीत करण्यात आलेल्या संगीत खुर्ची व लिंबू चमचा तसेच तिसरी ते पाचवीमधील विद्यार्थ्यांसाठी आयोजित मेहंदी व रांगोळी स्पर्धा यामधील विजयी स्पर्धकांचा सन्मान करण्यात आला.



शाळेत बाल आनंद बाजार आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सर्वाधिक विक्री करणारे विद्यार्थी, राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त सर्वोत्कृष्ट प्रकल्प सादर करणारे विद्यार्थी तसेच पाचवीमधील सैनिक स्कूल परीक्षेत यश संपादन करणारे विद्यार्थी तसेच मार्गदर्शन करणाऱ्या सुप्रिया पांगे यांचाही शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्यावतीने विद्यार्थ्यांना ट्रॉफी व रोख बक्षीस तर श्रीराम गणेश मित्र मंडळाच्या वतीने १६० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समीतीचे अध्यक्ष अमोल गांधी, सदस्य नानासाहेब मदने, समशेरसिंग रजपूत, हनुमंत पिसे, विजय देवकर, मुख्याध्यापक साळुंखे, तसेच आवताडे, बगाडे, वाघमारे, देशमुख, सुहास कोल्हे, राजू चौरे, गोरवे, हत्तीकर, शितल कोल्हे, देशमुख, महामुनी (पोतदार), करमाळकर, खटावकर, पाटील उपस्थित होते.

# हाजापूर-डोंगरगाव मार्गावर कत्तलीसाठी नेणाऱ्या जनावरांचे वाहन पकडले

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १० मार्च-**

हाजापूर ते डोंगरगाव जाणाऱ्या रोडवर पिकअप गाडी, तीन जर्शी गायी, एक बैल, दोन तांबड्या रंगाच्या गीरगायी अशी सहा जनावरे वाहनात भरुन कर्नाटकात कत्तलखान्याकडे घेवून जात असताना गोरक्षकांनी हे वाहन पकडून पोलीसाच्या ताब्यात दिले असून या प्रकरणी चालक किसन भारत गडहिरे (वय ३३,रा. आलेगाव ता. सांगोला) याच्या विरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी अमोल चौगुले (रा.कुरुल ता.मोहोळ) हे चार वर्षापासून गोरक्षक म्हणून काम करत आहेत. दि.८ मार्च रोजी रात्री ८.३० वाजता माहिती समजली की,सांगोला येथून चडचणकडे चारचाकी वाहनात जनावरे भरुन कत्तलखान्याकडे जात असल्याची माहिती मिळाली. फिर्यादीने पाठखळ या ठिकाणी येवून पुढे हाजापूर ते डोंगरगाव रोडवर थांबले असता एक चारचाकी वाहन क्रमांक एम.एच. ०४ एच.डी.२७७३ हे समोरुन आले.

सदरचे वाहन फिर्यादीने पोलीस स्टेशन येथे आणून लावल्यावर हौदयामध्ये पाहणी केली असता त्यामध्ये ७५ हजार रुपये किंमतीच्या तीन जर्शी गायी,एक काळा बैल, दोन तांबड्या रंगाच्या गीर गायी अशी एकूण सहा जनावरे त्यामध्ये आढळून आली. पोलीसांनी १ लाख ५० हजार रुपये किंमतीचे पिकअप व जनावरे असा एकूण २ लाख २५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### मराठी शाळा क्रमांक सहामध्ये विज्ञान दिन साजरा

**सोलापूर, दि. १० मार्च-**

जोड बसवण्णा चौका येथील महानगरपालिका मराठी मुलांचे शाळा क्रमांक सहा मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त डॉ. सी व्ही रमण यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय विज्ञान प्रयोग आयोजन करण्यात आले होते. मनपा मराठी मुलांची शाळा क्रमांक सहा सोलापूर येथे राष्ट्रीय विज्ञान विज्ञान प्रयोगाचे आयोजन करण्यात आलेले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन आंध्र भद्रावती माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक मोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. परीक्षक म्हणून महानगरपालिका प्रशाला क्रमांक तीनचे सहशिक्षक सागर कांबळे यांनी काम पाहिले. महानगरपालिका मराठी मुलांची शाळा क्रमांक सहाच्या मुख्याध्यापिका अश्विनी लांबतुरे उपस्थित होत्या.

# पंढरपुरात महिला पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० मार्च-**

पोलिसाची नोकरी व कुटुंब यांची यशस्वी सांगड घालून विविध आव्हानांचा सामना करीत गुन्ह्यांचा उत्कृष्ट तपास समुपदेशनाद्वारे मोडणारे संसार वाचवणे त्याचबरोबर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पोलीस महिला अधिकारी व कर्मचारी यांचा सन्मान जागतिक महिला दिनानिमित्त शहर पोलीस स्टेशनच्या वतीने सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे व शहर पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा व शालेय विद्यार्थ्यांनीचा सन्मान करण्यासाठी पंढरपूर शहर पोलीस स्टेशनच्यावतीने पोलीस संकुल पंढरपूर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



आजच्या समाजव्यवस्थेत स्त्रिया कुटुंब, सेवा, शिक्षण तसेच सामाजिक क्षेत्रात अत्यंत जबाबदारीने कार्य करत आहेत. तसेच सर्वच क्षेत्रांत स्वतःची ओळख निर्माण करत आहेत.

जिद्द, निष्ठा आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे, असे मत सहा. पोलीस अधीक्षक डगळे यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी पंढरपूर उपविभागातील महिला अधिकारी,पोलीसठाणे येथील महिला पोलिस अंमलदार तसेच पंढरपूर शहरातील प्रतिष्ठीत महिला, डॉक्टर, महाविद्यालयीन शिक्षिका व शालेय विद्यार्थिनी यांचा सन्मान करण्यात आला आहे.





## अक्कलकोटमधील दोन विद्यार्थ्यांचे गणित प्राविण्य परीक्षेत यश

**अक्कलकोट, दि. १० मार्च-**

महाराष्ट्र गणित अध्यापक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या गणित प्राविण्य परीक्षेत तालुक्यातील इंडियन मॉडेल स्कूल, अक्कलकोट येथील इयत्ता पाचवीतील विद्यार्थी वेदांत अभिषेक जोजन तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कडबगाव येथील शयान नबीलाल मियावाले यादोन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

# उडगी येथे हजरत पीर जिंदावली बाबांचा उरूस उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० मार्च-**

तालुक्यातील उडगी येथे सर्वसमाजाचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत पीर जिंदावली बाबांच्या ८१ व्या उरूसानिमित्त तीन दिवसांची यात्रा उत्साहात संपन्न झाली. धार्मिक विधी, सांस्कृतिक कार्यक्रम, पौराणिक नाटके, कलगीतुऱ्यांची मैफल आणि जंगी कुस्ती स्पर्धांमुळे यात्रेला विशेष रंगत आली. सर्व जाती-धर्मातील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने यात्रेत सहभाग घेत सामाजिक ऐक्याची परंपरा जपली. थोक्यात हेडींग सांगणे

यात्रेच्या प्रारंभी अक्कलकोट येथील हजरत शेख नूरुद्दीन दर्गाहचे प्रमुख सज्जादनशीन सय्यदशा नशीरपाशा कदीर पाशा पीरजादे यांच्या हस्ते महाअभिषेक विधीवत पार पडला.

यानंतर आकर्षक विद्युत रोषणाई आणि हारफुलांनी सजविलेल्या रथाची मिरवणूक काढण्यात आली. कै. राम पाटील यांच्या घरापासून प्राथमिक शाळेजवळील जिंदावली पादकट्टा येथे ही मिरवणूक पोहोचली. 'जिंदावली की दोस्तरा हो धीनच्या' अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता. मार्गावर



भाविकांनी पुष्पवृष्टी, चुरमुरे व खोबरे उधळून रथाचे स्वागत केले. पारंपरिक वाद्यांचा गजर, विविध लोककला आणि दारूकामाच्या आतषबाजीने मिरवणुकीची सांगता झाली.

दुसऱ्या दिवशी दिवसभर भाविकांनी नैवेद्य अर्पण करून नवस फेडले. सायंकाळी गावातील नाट्यप्रेमींनी वीरभद्रेश्वर कला नाट्य संघाच्या वतीने ''देवीय महात्मे'' या पौराणिक बैलाटा नाटकाचा पहिला प्रयोग सादर केला. या प्रयोगाचे उद्घाटन महादेव धानशेट्टी यांच्या हस्ते झाले. तिसऱ्या दिवशी दिवसभर कलगीतुऱ्यांच्या कन्नड गाण्यांची रंगतदार मैफल रंगली. सायंकाळी पाच वाजता जंगी कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील अनेक मल्लांनी कुस्ती खेळत प्रेक्षकांची दाद मिळवली.

स्पर्धेनंतर परगावाहून आलेल्या भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली. रात्री ११ वाजता दुसऱ्या नाट्यप्रयोगाचे उद्घाटन गुडडप्पा येळमेली यांच्या हस्ते करण्यात आले. संदलच्या दिवशी चालक-मालक संघटनेतर्फे भाविकांसाठी मोफत वाहनसेवेची सोय करण्यात आली होती. यात्रा काळात पंच कमिटीने महाप्रसाद व पाणी वाटपाचे उत्तम नियोजन केले. उडगीतील या यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी पंच कमिटीचे चंद्रकांत पाटील, पंडित मैत्री, शिवानंद येळमेली, यासीन मुजावर, मालबा कुसेकर यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

### रक्तदान शिबिराला प्रतिसाद

यात्रेनिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात ४३ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकी जपली.

### नाटक आणि कलगीतुऱ्यांनी रंगली रात्र

वीरभद्रेश्वर कला नाट्य संघाच्या कलाकारांनी सादर केलेल्या देवीय महात्मे या पौराणिक बैलाटा नाटकाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच कलगीतुऱ्यांच्या कन्नड गाण्यांनी यात्रेची रात्र रंगून गेली.

### कुस्त्यांमध्ये मल्लांचा दमदार खेळ

यात्रेच्या सांगतेप्रसंगी आयोजित जंगी कुस्ती स्पर्धेत पंचक्रोशीतील मल्लांनी सहभाग घेतला. दमदार झुंजींमुळे प्रेक्षकांची मोठी गर्दी झाली होती.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मोडनिंब येथील हायमास्ट दिवा कार्यान्वित

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १० मार्च-**
मोडनिंब येथील राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपूलाजवळ बसविण्यात आलेला १०० फूट उंचीचा हायमास्ट दिवा अनेक दिवसांपासून बंद असल्याने परिसर अंधारात होता. रात्री वाहनचालक व प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत असून अपघाताचा धोका वाढत असल्याचे वृत्त दैनिक सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध झाले होते.

या वृत्ताची दखल घेत संबंधित यंत्रणेकडून घेण्यात आली असून तातडीने दुरुस्तीची कामे करून, सदर हायमास्ट दिवा कार्यान्वित करण्यात आला आहे. त्यामुळे उड्डाणपूल परिसरात आता प्रकाशव्यवस्था सुरू झाली असून वाहनचालक व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

स्थानिक नागरिकांनी पत्रकार प्रथमेश रविंद्र पवार यांनी दैनिक तरुण भारतने मांडलेल्या प्रश्नामुळे समस्या मार्गी लागल्याची प्रतिक्रिया मोडनिंब मधील नगारिकांतून व्यक्त केली आहे.

**तरुण भारत Impact**

**निवेदनाद्वारे प्रशासनाकडे पाठपुरावा**

हायमास्ट दिवा बंद असल्याने परिसरात अंधाराचे साम्राज्य होते. याबाबतमनसेचे प्रशांत गिड्डे, गटप्रमुख दिपक सुर्वे, सिद्धार्थ शेडगे, नितीन गडधरे, वेताळ परिवार तसेच विविध राजकीय, सामाजिक संघटना सजग नागरिक यांनी प्रशासनाकडे निवेदन देत पाठपुरावा केला होता.



### महत्त्वाचे



### जय महाराष्ट्र युवा मंचाचा राज्यस्तरीय शिवसन्मान आदर्श संस्था पुरस्काराने गौरव

**पंढरपूर, दि. १० मार्च-**
येथील सामाजिक व शिवविचारांना वाहिलेल्या जय महाराष्ट्र युवा मंच या संस्थेला राज्यस्तरीय 'शिवसन्मान आदर्श संस्था' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तोरणा गडाच्या पायथ्याशी पार पडलेल्या तोरणा महोत्सवात शिवशंभू संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जय महाराष्ट्र युवा मंच व रुक्मिणी प्रतिष्ठान या संस्थांकडून गेल्या अनेक वर्षांपासून किल्ले स्पर्धा, रक्तदान शिबिर, शिवकालीन शस्त्र प्रदर्शन अशा विविध सामाजिक व ऐतिहासिक उपक्रमांचे आयोजन केले जाते.सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून सिद्धार्थ कंक (येसाजी कंक यांचे वारसदार), राहुल शेलार (शेलार मामा यांचे वारसदार), सचिनजी भोसले (नागपूर गादीचे वंशज), अनिकेत महाराज मोरे (तुकाराम महाराजांचे वंशज), शिवव्याख्याते समाधान हेगडे तसेच शिवशंभू संघटनेचे संस्थापक महादेव पवार उपस्थित होते. त्यांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक श्रीराम साळुंखे , सोहम व्होरा, रामकृष्ण बिडकर, योगेश बारस्कर, ऋषिकेश आगवणे, धीरज गोसावी, रोहित आसबे यांनी पुरस्कार स्वीकारला.



### चपळगावमध्ये इफ्तार पार्टी

**अक्कलकोट, दि. १० मार्च-**
तालुक्यातील चपळगाव येथील जामा मस्जिद येथे येथील श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश मालक इंगळे यांच्या वतीने नुकतेच रमझान ईदच्या पवित्र महिन्या निमीत्त चपळगाव मधील रोजा (उपवास) राहणाऱ्या मुस्लीम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या चपळगाव जामा मस्जिद येथील इफ्तार पार्टीत चपळगांव येथील मौलाना मुफ्ती, सलाहुद्दीन साहब, सलीम पटेल, मुबारक शेख, मुरतूज पटेल, युनूस पटेल, रमेश शिंदे, मेंबर महबूब तांबोळी, एजाज पटेल, अल्लाउद्दीन फुलारी, अब्बास पटेल, आलिम पटेल, मोहसिन पटेल, यासीन फुलारी, फैजान पटेल, रहमान सय्यद, कैफ पटेल, सैपन फुलारी, अयान पटेल, रहमान पटेल, आदींसह सर्व हिंदू मुस्लीम बांधव व महेश मालक इंगळे मित्र परिवार मधील रमेश शिंदे, श्रीकांत झिपरे, बाबा सुरवसे आदी सहभागी झाले होते.



### 'लोकविकास'मध्ये महिला सक्षमीकरण सप्ताह

**अक्कलकोट, दि. १० मार्च-**
२ मार्च ते ८ मार्च या कालावधीत लोकविकास मराठी मिडियम स्कूल, वेळापूर येथे महिला सक्षमीकरण सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन विजया चापले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रभात फेरीने करण्यात आली. यानंतर डॉ. स्नेहल पताळे यांनी उपस्थित महिलांना व विद्यार्थ्यांनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. महिलांनी दैनंदिन जीवनात आरोग्याची कशी काळजी घ्यावी, संतुलित आहाराचे महत्त्व आणि नियमित तपासणीचे फायदे याबाबत त्यांनी माहिती दिली. सप्ताहात महिला चर्चासत्राचे देखील आयोजन करण्यात आले होते. महिलांनीही आपल्या अनुभवांची देवाणघेवाण करत चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. यावेळी मेहंदी स्पर्धा आणि संगीत खुर्ची स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.



### वेळापूर पोलिस स्टेशनमध्ये महिला दिन साजरा

**वेळापूर, दि. १० मार्च-**
वेळापूर (ता. माळशिरस) येथील वेळापूर पोलीस स्टेशनच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महिला पोलीस कर्मचारी सोनाली सोनवलकर, कविता आवताडे, सोनाली शिंदे, प्रियंका सुर्यवंशी, नसीमा मुलाणी, स्वाती लोंढे, वैष्णवी बाबर यांचा वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना प्रभारी अधिकारी आशिष कांबळे म्हणाले की, कुटुंब, समाज आणि नोकरी या सर्व जबाबदाऱ्या सांभाळत त्या उत्कृष्ट कार्य करत आहेत. महिलांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देणे ही समाजाची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

## भाजपाच्या जिल्हा परिषद गटनेतेपदी रश्मी बागल

- उपपक्षनेता प्रदीप खांडेकर; पक्षप्रतोदपदी केदार-सावंत
- नेताजी खंडागळे यांच्याकडे पक्ष प्रवक्तेपदाची जबाबदारी
- जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्र सादर





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**
जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीची तारीख १८ मार्च असून, याबाबत भाजपकडून कमालीची गोपनीयता बाळगली जात आहे. दुसरीकडे महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाने चरणराज चवरे तर राष्ट्रवादी काँग्रेसने विजयराज डोंगरे यांची निवड केली आहे. दोन्ही पक्षांनी मोहोळ तालुक्यातूनच गटनेते पदास संधी दिली आहे. तर भाजपकडून करमाळा तालुक्याला संधी दिली असून, भाजपच्या गटनेतेपदाची निवड मंगळवारी पार पडली.

यामध्ये रश्मी दिगंबर बागल यांची गटनेतेपदी बिनविरोध निवड झाल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी दिली. तर उपपक्षनेतापदी प्रदीप खांडेकर, पक्षप्रतोदपदी चेतनसिंह केदार आणि नेताजी खंडागळे यांच्याकडे पक्ष प्रवक्तेपदाची जबाबदारी देण्यात आली असून, याबाबतचे पत्रही जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आले आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपाचे ३८ सदस्य निवडून आलेले आहेत. यामुळे भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. यासाठी येत्या १८ मार्च रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत त्यांचा अध्यक्षही ठरणार आहे. दरम्यान, यासाठी भाजपा पक्षश्रेष्ठींनी रश्मी बागल गटनेतेपदी यांची निवड केली आहे. त्यामुळे आता अध्यक्षपदाच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ११ जिल्हा परिषद सदस्य विजयी झाले आहेत. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी जि.प. सदस्य विजयराज डोंगरे यांची निवड केली. शिवसेनेने गटनेतेपदी चरणराज चवरे यांची निवड केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने अद्याप आपली भूमिका स्पष्ट केली नाही. राष्ट्रवादी काँग्रेस विरोधी पक्षनेतेपदावर दावा करणार असल्याची शक्यता आहे. या निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाल्याने जिल्हा परिषद स्थापनेनंतर पहिल्यांदाच जिल्हा परिषदेत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेपासून दूर राहणार आहेत.

**आता १८ तारखेकडे लक्ष**

जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीची तारीख १८ मार्च असून, सध्या जिल्हाधिकारी यांच्याकडे गटनेता निवडीचे पत्र, सर्व सदस्यांची यादी, पक्षाची घटना, सर्व सदस्यांचे प्रतिज्ञापत्र भाजपाकडून देण्यात दिले आहे. सध्या भाजपकडून कमालीची गोपनीयता बाळगली जात आहे. अध्यक्षपदाबाबत तर्कवितर्क सुरु असून, १८ तारखेलाच अधिकृत अध्यक्षपदाचे नाव कळणार आहे.

## साखरेचे हार २० ते ३० टक्क्यांनी महागले

**कच्च्या मालाच्या दरवाढीचा फटका | सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० मार्च-**
चैत्र पाडव्या निमित्त गुढीला घालण्यासाठी लागणारे साखरेचे हार किंवा गाठी तयार करण्याचे काम येथे युध्दपातळीवर सुरु आहे. साखरेचे हार तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या दरामध्ये वाढ झाली आहे. यामुळे यंदाच्या वर्षी गुढीपाडवा सणासाठी लागणाऱ्या साखरेच्या हाराच्या किमतीमध्ये वाढ झाली असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना आर्थिक फटका बसणार आहे.

येत्या १९ मार्च रोजी चैत्रपाडवा अर्थात गुढीपाडव्याचा सण साजरा होणार आहे. या सणाचे औचित्य साधून शहरातील नागरिक घरावर गुढी उभी करीत असतात. चैत्र पाडव्या दिवशी उभारल्या जाणाऱ्या गुढीस साखरेचा हार घालण्याची परंपरा आहे. तसेच लहान मुले व देवतास देखील साखरेचे हार घातले जातात. यामुळे साखरेच्याहारस किंवा गाठीस चांगली मागणी असते. पंढरपुरात गेल्या महिन्यापासून साखरेचे हार तयार करण्यास सुरुवात झाली आहे. हार तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या दरामध्ये वाढ झाली आहे. यामुळे यंदाच्या वर्षी साखरेच्या हाराच्या किमती २० ते ३० टक्के वाढ होणार असल्याचे दिसून येत आहे. सध्या ठोक बाजारात साखरेचे हार ११० ते १३० रुपये किलो दराने विक्री होत आहेत. मात्र बाजारात १५० ते २०० रुपये किलो दराने विक्री होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. साखरेच्या हाराच्या दरामध्ये वाढ झाली असल्याने नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडणार आहे.

## वनविभागाच्या चुंब येथील डोंगराला आग

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १० मार्च-**
चुंब येथील गावाजवळील वन विभागाच्या डोंगराला लागलेल्या आगीमूळे गावचे शेतकरी जनक प्रभू सांगळे यांची आंब्याची झाडे जळाली. या दुर्देवी घटनेत आंबे जळाल्याने शेतकऱ्याचे १ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली आहे.

वनीकरण पेटून आग लागल्याची घटना ८ मार्चला दुपारी ३च्या सुमारास घडली. शेतकरी जनक सांगळे यांच्या बागेतील आंब्याच्या झाडास फळेही लागलेली होती. या आगीत २० आंब्यांची झाडे जळाल्याने प्रचंड नुकसान झाले आहे. काही दिवसांतच आंबे विक्रीस येणार होते. परंतु आग लागल्याने संपूर्ण हंगामावर पाणी फेरले. दरम्यान, सांगळे यांच्या शेतीच्या पूर्व व पश्चिम बाजूस वन विभागाचा डोंगर असून दरवर्षी या डोंगराला आग लागण्याच्या घटना घडत असल्याचे त्यांनी सांगितले. या आगीमुळे त्यांच्या शेतीचे वारंवार नुकसान होत असल्याची तक्रार त्यांनी केली आहे. या घटनेची वन विभागाने तातडीने दखल घेऊन नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी सांगळे यांनी केली आहे. तसेच आग आणि त्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी त्यांनी केली आहे.



## जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मार्च-**
जिजाऊ ब्रिगेड यांच्यावतीने मजरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्षा उज्वलाताई साळुंके यांचे सावित्रीबाईचे जीवनचरित्र या विषयावर व्याख्यानचे आयोजन करण्यात आले होते. महिला दिनानिमित्त शिक्षिका पद्मा पाटील व ललिता राठोड, युवा उद्योजिका प्रिया आगलावे यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास जिजाऊ ब्रिगेड सल्लागार लता ढेरे, अभिंजली जाधव, शहराध्यक्षा प्रिती कदम, लक्ष्मी माने, छाया शिंदे, अर्चना माने, दिपाली पाटील उपस्थित होते. मुख्याध्यापक शिवानंद भिमनवरु, प्रकाश राचेटी, सिराज नदाफ, अमसिद्ध तीर्थकर, बसवराज निंबर्गी यांचे सहकार्य लाभले.

## अकलूज बैलगाडा शर्यत : १४ मार्चला रंगणार सामना

**रोख बक्षिसांची लयलूट**



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १० मार्च-**
अकलूज येथे बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेचे हे द्वितीय वर्ष आहे या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथम येणाऱ्या बैल जोडीचा आहे सन्मान करण्यात येतो

गतवेळेच्या थरारानंतर पुन्हा एकदा बैलगाडा शर्यत शौकीनासाठी शनिवारी दि.१४ मार्च रोजी आनंदनगर येथे बैलगाडा शर्यत रंगणार असल्याची माहिती स्पर्धेचे संयोजक मदनसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

शंकरनगर येथील विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्या वतीने सहकार महर्षी कै. शंकरराव मोहिते-पाटील यांच्या पुण्यस्मरण निमित्त माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकलुज-चाकोरे रोडवरील शिवकीर्ती शेती फार्म आनंदनगर येथे २५ ते ३० एकराच्या काळ्या मातीत बैलगाडा शर्यतीचे आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या बैलगाड्यास रोख रु. १ लाख ५० हजार व चषक तर बैलजोडीला झुल, बाशिंगे, द्वितीय क्रमांक रु.१ लाख १० हजार व चषक, तृतीय रु. ७१ हजार व चषक,चतुर्थ रु.६१ हजार व चषक, पाचवा रु.५१ हजार व चषक,सहावा रु.३१ हजार व चषक, सातवा रु.२१ हजार व चषक, आठवा रु.११ हजार व चषक,तसेच सेमीफायनलमधे २ नंबर उतरणा-यांना गाडीला योग्य बक्षीस देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी स्पर्धकासाठी शुक्रवार दि.१३ मार्च २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ऑनलाइन नाव नोंदणी करता येणार आहे. स्पर्धक, स्पर्धा पाहणा-यांना शुद्ध पाणी, सुरक्षिततेसाठी बॅरेगेटींग लावण्यात येणार आहे. दुखापतग्रस्तासाठी आरोग्य अधिकारी व रुग्णवाहिका सोय करण्यात आली आहे. स्पर्धा महाराष्ट्र बैलगाडा शर्यत संघटनेच्या नियमानुसार घेण्यात येणार असुन स्पर्धा सुरवात ते अंतिम रेषेपर्यंत चित्रीकरण करण्यात येणार तर तज्ञ व पदसिद्ध पंच नियुक्तीने निःपक्षपाती निकाल मिळण्यास मदत होणार असल्याचे मदनसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले. स्पर्धेच्या मैदानाची तयारी जिल्हा परिषद सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील हे करीत आहेतयावेळी सचिव राजेंद्र काकडे,विश्वस्त चंद्रकांत कुंभार, श्रीकांत राऊत, लक्ष्मण पवार, देविदास ढोपे, भिमराव काळे, गणेश काळे, विठ्ठल अर्जुन, आप्पासाहेब रुपनवर, लखन चव्हाण, संतोष शिंदे, राजेंद्र पवार आदी उपस्थित होते.

## शिक्षक भरतीला गती; डी.एड-बी.एड अभ्यासक्रमांना मिळतेय विद्यार्थ्यांची पसंती

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.१० मार्च-**
राज्यात २०१७ नंतर शिक्षक भरती प्रक्रिया पुन्हा सुरू झाली असून सध्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमापन चाचणी तसेच शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) घेतल्या जात आहेत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात पुन्हा रोजगाराच्या संधी निर्माण होतील, या अपेक्षेने विद्यार्थ्यांचा डी.एड व बी.एड अभ्यासक्रम ांकडे कल वाढताना दिसत आहे. भविष्यात शिक्षक होण्याची संधी मिळेल या विश्वासाने अनेक विद्यार्थी या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेताना दिसत आहेत.

दरम्यान, राज्यात काही वर्षे शिक्षक भरती नियमितपणे होत नसल्यामुळे डी.एड व बी.एड अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरवली होती. विशेषतः २०१२ मध्ये शिक्षक भरतीवर बंदी आल्यामुळे जिल्ह्यातील अनेक अध्यापक महाविद्यालयांवर मोठा परिणाम झाला. परिणामी अनेक महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या अभावाचा सामना करावा लागला.

राज्यातील समाजकल्याण विभागाच्या निवासी शाळा तसेच आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रम शाळांमध्येही टीईटी पात्र शिक्षकांची भरती मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये आशादायक वातावरण निर्माण झाले आहे. राज्य तसेच केंद्र सरकारच्या स्तरावर शिक्षक पदांची भरती होत असल्यामुळे अध्यापन क्षेत्रात करिअर करण्यासाठी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वाढत आहे.




डी.एड व बी.एडच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शिक्षक पात्रता परीक्षा देता येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला आहे. त्याम ुळे शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल पुन्हा वाढत असल्याचे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. येणाऱ्या काळात टेट आणि टीईटी परीक्षा नियमित स्वरूपात घेतल्या गेल्यास या अभ्यासक्रमांना आणखी मागणी वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पवित्र पोर्टल शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले की, डी.एड व बी.एड महाविद्यालयांचे अस्तित्व टिकवण्यासाठी दरवर्षी किमान एकदा शिक्षक अभियोग्यता परीक्षा आणि दोन वेळा शिक्षक पात्रता परीक्षा घ्याव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.

| राज्यातील महाविद्यालये |
| --- |
| **डी.एड.** |
| ५८७ एकूण |
| ३९६ खासगी |
| ८४ सार्वजनिक-खासगी |
| ४७ सरकारी |
| **बी.एड** |
| ६०२ एकूण |
| ४५२ खासगी |
| ४३ सार्वजनिक-खासगी |
| २३ सरकारी |

**डी.एड. महाविद्यालयाची स्थिती**

मागील काही वर्षांत शिक्षक भरतीला खंड पडल्यामुळे तसेच काही ठिकाणी डोनेशनची पद्धत वाढल्याने विद्यार्थ्यांची संख्या घटली होती. परिणामी मागील १५ वर्षांत सोलापूर जिल्ह्यातील ४० पेक्षा अधिक डी.एड महाविद्यालये बंद पडली. सध्या जिल्ह्यात २८ डी.एड महाविद्यालये सुरू असून त्यामध्ये सुमारे १,५०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची क्षमता आहे.

**बी.एड महाविद्यालयांची स्थिती**

सोलापूर जिल्हा विद्यापीठांतर्गत एकूण २३ बी.एड महाविद्यालये आहेत. त्यापैकी काही महाविद्यालये बंद असून १५ महाविद्यालयांमध्ये बी.एड अभ्यासक्रम सुरू आहे. ३ महाविद्यालये अनुदानित १२ महाविद्यालये विनाअनुदानित प्रत्येक महाविद्यालयात ५० प्रवेश क्षमता जिल्ह्यात एकूण ७५० जागा उपलब्ध असून, यावर्षी सोलापूर जिल्ह्यात डी.एड, बी.एड आणि एम.एड अभ्यासक्रमांसाठी सुमारे १,४७० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.